अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# मोदी लाटेनंतर काँग्रेसला राज्यात वादळाची भीती

बुडत्याला काडीचा आधार म्हणून राज्यातले आघाडी सरकार मंत्रीमंडळ विस्तार करीत आहे. परंतु लोकसभा निवडणुकीमध्ये ज्या पध्दतीने दोन्ही काँग्रेसचा पराभव झाला हे पाहिल्यावर अशा फुटकळ उपाययोजना करून विधानसभा निवडणुका जिंकता येणार नाहीत हे दोन्ही काँग्रेसच्या लक्षात यायला पाहिजे. नरेंद्र मोदी यांच्या लाटेमुळे भुईसपाट झालेल्या दोन्ही काँग्रेसला काहीच सुचेनासे झाले आहे. पराभवाचे चिंतन करण्याऐवजी त्यांच्या वागण्या बोलण्यातून चिंताच जास्त दिसत आहे. या पराभवाने खचलेल्या काँग्रेस नेत्यांना धड उपाययोजनाही सूचत नाहीत अशी एकूण परिस्थिती दिसते. कारण या पराभवातून मार्ग काढण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने जर काही जणांना मंत्रीमंडळात घेण्याचा निर्णय घेतला असेल तर ती विनाशकाले विपरित बुध्दी असेच म्हणावे लागेल. इथे शरद पवार, अजित पवार किंवा पृथ्वीराज चव्हाणांची डाळ शिजली नाही तिथे जितेंद्र आव्हाडांना मंत्रीमंडळात घेऊन कोणता मोठा फरक पडणार आहे. मुळातच हा निर्णय अत्यंत चुकीचा ठरतो.

एकीकडे नरेंद्र मोदी आपले मंत्रीमंडळ छोटे ठेवण्याचा आग्रह धरीत आहेत. तर राज्यातले काँग्रेस सरकार नव्या मंत्र्यांच्या नियुक्त्या करीत आहे. डॉ.गावित यांच्या रिकाम्या झालेल्या जागेवर जरी आव्हाडांची वर्णी लागत असली तरी त्यासाठी आताची वेळ योग्य नव्हती. पुढच्या तीन महिन्यामध्ये राज्यातील विधानसभा निवडणुकींची धुमधडाका सुरू होईल. आधीच लोकांमध्ये दोन्ही काँग्रेसविषयी नाराजी आहे त्यात पुन्हा जर हे दोन्ही पक्ष सत्तेची मुजोरी दाखवून निवडणुका जिंकण्याचा घाट घालत असतील तर मग ते विधानसभा निवडणुकीतही भुईसपाट झाल्याशिवाय राहणार नाही. इतके वर्षे राजकारणात राहूनही पराभवाचे विश्लेषण करता येत नसेल आणि त्यातून कोणताच धडा घेता येत नसेल तर या दोन्ही पक्षांना भविष्यातील पराभवाने आतापासूनच घेरून घेरले आहे, असे म्हणावे लागेल. जे काँग्रेस नेते कोणतीही मोदी लाट राज्यात नाही असे म्हणत होते त्यांना या लाटेचा जबरदस्त तडाखा सहन करावा लागला. त्याची झळ विधानसभा निवडणुकीतही पोहचू शकते. उलट आपण कसे आपले अस्तित्व कसे टिकवायचे याची त्यांनी चिंता करायला हवी.

## मंत्रीमंडळ विस्तार नको कपात हवी

घर फिरले की घराचे वासे फिरतात असे म्हणतात. असे या दोन्ही पक्षांबाबत झालेले दिसते. कारण त्यांनी ज्या पध्दतीने उपाययोजना करायला हव्यात तशा त्यांनी सुरू केलेल्या नाहीत. सामान्य मतदार आपल्यावर का नाराज आहेत याचा त्यांनी अजूनही शोध घेतलेला दिसत नाही. महागाई, भ्रष्टाचार ही त्या पराभवामागची कारणे तर आहेतच. परंतु त्याबरोबरच महाराष्ट्रात असलेली बेरोजगारी घरांच्या वाढत्या किंमती स्वस्त धान्य दुकानांमधला भ्रष्टाचार अन्नसुरक्षा योजना राबवण्यातला ढिसाळपणा अशी एक ना अनेक कारणे पराभवाचे कारण ठरू शकतात. या मूलभूत समस्यांशिवाय जलसिंचन योजनांमध्ये घोटाळे करून शेतकऱ्याला लुबाडण्याचा प्रयत्न होतो. आदिवासींच्या आश्रमशाळांच्या नावाने असलेले धान्य खुल्या बाजारात विकले जाते. तिथली मुले उपाशी राहतात. कर्जबाजारी शेतकऱ्यांना पुरेशी मदत मिळत नाही. ऊसतोडणी कामगार असो किंवा शहरातला माथाडी कामगार असो. यांना किमान वेतनही मिळत नाही. अशा सगळ्या समस्यांचा डोंगर उभा आहे. सलग तीन वेळा सत्तेवर येऊन दोन्ही काँग्रेसच्या कामाची ही पध्दत असेल तर लोकांनी यांना मते का द्यायची. असा प्रश्न निर्माण होतो. लोकसभा निवडणुकीतल्या पराभवानंतर या दोन्ही पक्षांना जर थोडाफार धडा घ्यायचा असेल तर त्यांनी पुढचे तीन महिने तरी सत्तेचे लोणी खाणे बंद करावे. मंत्रीमंडळ विस्तार कसला करता. आहे त्या मंत्रीमंडळात कपात करा. सरकारचे पैसे वाचवा. मंत्र्यांना आमदारांना आपापल्या मतदारसंघामध्ये कामाला लावा.तरच लोकांचा गमावलेला विश्वास मिळवू शकाल.

## निवडणुकीपूर्वीच पराभवाचे डोहाळे

याविरुध्दपरिस्थितीभाजपाआणिशिवसेनेमध्ये दिसत आहे.लोकसभा निवडणुकीतल्या विजयाने त्यांचा उत्साह आणखीनच वाढला आहे. महाराष्ट्रातही युतीला पूर्ण बहुमत मिळेल अशी त्यांची व्यूहरचना सुरू झालेली आहे. कारण या मोदी लाटेचा प्रभाव पुढचे सहा महिने टिकवून ठेवण्याचा ते आटोकाट प्रयत्न करणार आहेत. हीच मोदी लाट वादळ कसे होईल आणि महाराष्ट्रातला हा काँग्रेसचा बालेकिल्ला कसा ढासळेल यासाठी प्रयत्नांमध्ये कोणतीच कसूर सोडायची नाही, अशा प्रयत्नांना त्यांनी सुरुवात केली आहे. त्यासाठीच उत्तरप्रदेशात ८० पैकी ७३ जागा मिळवून देणाऱ्या गुजरातच्या अमित शहांना महायुतीने आवतण पाठवले आहे.

उत्तरप्रदेशप्रमाणे इथेही त्यांनी आपले कौशल्य दाखवून काँग्रेसच्या डोळ्यापुढे काजवे चमकवावेत अशी इथल्या नेत्यांची इच्छा आहे. त्यांचे हे प्रयत्न आणि सत्ताधारी दोन्ही काँग्रेसची उडत असलेली फजिती याची तुलना केली तर मोठा फरक दिसून येतो. पराभवाच्या छायेतून बाहेर न आलेले हे पक्ष आणि त्यांचे नेते इतके उलटसुलट निर्णय घेत आहेत की जणूकाही निवडणुकीपूर्वीच त्यांनी पराभवाचे चिंतन सुरू केले असावे. सामान्य माणसाच्या हिताचे तीनच मोठे निर्णय राज्याच्या आघाडी सरकारने घ्यावे याचा थेट फायदा राज्यातल्या प्रत्येक नागरिकाला मिळेल. परंतु पराभवाच्या चिंतनापेक्षा जाता जाता पुन्हा आपले हात कसे धुवून घेता येतील अशी त्यांची प्रवृत्ती दिसून येते.